शासकीय व निम-शासकीय सेवेत आरक्षित पदांवर मागासवर्गीयांची भरती करण्याबाबत सरळ सेवा भरतीचा अनुशेष भरून काढण्यासाठी खास प्रयत्न.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक: बीसीसी-१०८९/प्र.क्र.२२१/८९/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ३० सप्टेंबर, १९८९.

वाचा :- [१] शासकीय परिपत्रक सम क्रमांक, दिनांक १२ जुलै, १९८९.

[२] शासकीय परिपत्रक सम क्रमांक, दिनांक ११ ऑगस्ट, १९८९.

परिपत्रक :- विशेष भरती मोहिमेच्या संदर्भात मागासवर्गीयांच्या दिनांक ३० जून, १९८९ पर्यन्तच्या सरळसेवा भरतीचा अनुशेष भरून काढतांना राखीव पदांवर बिगर मागासवर्गीयांची नियुक्ती केली असल्यास त्यांना सेवामुक्त करावे असा निर्णय शासनाने जुलै, १९८९ मध्ये घेतला होता व त्या संदर्भात वर नमूद केलेल्या दिनांक १२ जुलै, १९८९ च्या परिपत्रकान्वये आदेश निर्गमित केले आहेत. या संदर्भात सध्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांकडून त्यांना सेवामुक्त केल्यास त्यांच्या पुढे गंभीर समस्या निर्माण होतील अशी अनेक निवेदने शासनाकडे प्राप्त झाली आहेत. तसेच अशाच काही कर्मचाऱ्यांनी उच्च न्यायालयाकडे धाव घेतली असून न्यायालयाने त्यांना सेवामुक्त करण्याबाबत स्थगितीचे आदेश दिले आहेत. ह्या सर्व परिस्थितीचा विचार करून शासनाने दिनांक २६ सप्टेंबर, १९८९ रोजी टेलेक्स द्वारे सर्व संबंधितांना बिगर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना सेवामुक्त करु नये म्हणून सूचना दिल्या आहेत. ह्या संदर्भात आता अनुशेष भरून काढण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत खालील प्रमाणे तपशीलवार आदेश देण्यात येत आहेत :-

[१] दिनांक ३० जून, १९८९ पर्यन्तची मागासवर्गीयांची सरळसेवा भरतीच्या अनुशेषाची पदे भरणे, केवळ या कारणास्तव दिनांक २६ सप्टेंबर, १९८९ रोजी शासकीय सेवेत असलेल्या बिगर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना सेवामुक्त करु नये. इतर कारणास्तव अशा बिगर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना सेवामुक्त करण्यास मात्र हरकत नसावी. उदा. पदे रद्द झाल्याने.

[२] दिनांक ३० जून, १९८९ पर्यन्तचा सरळ सेवा भरतीचा अनुशेष भरून काढण्यासाठी निवड केलेल्या मागासवर्गीयांना खालील पध्दतीने सामावून घेण्यात यावे :-

[अ] भरतीस सध्या उपलब्ध झालेली रिक्त पदे, आवश्यकते प्रमाणे १००% पर्यन्त, अनुशेष भरून काढण्यासाठी वापरण्यात यावीत. अनुशेष भरून काढल्यानंतर रिक्त पदे शिल्लक असल्यास त्या रिक्त पदांसंबंधी आरक्षण नेहमीच्या नियमाप्रमाणे जास्तीत जास्त ५०% पर्यन्त मर्यादित राहील.

[ब] उपलब्ध रिक्त पदे अनुशेष भरून काढण्यासाठी पुरेशा प्रमाणात नसतील, तर जी पदे ६ महिने रिक्त म्हणून ह्या पूर्वी व्यपगत झाली असतील त्या पदांमधून अनुशेष भरून काढण्यासाठी आवश्यक असतील तेवढी पदे पुनरुज्जीवित करण्यात यावी व ती सर्व पदे अनुशेष भरून काढण्यासाठी वापरण्यात यावीत.

[क] वरील [अ] व [ब] येथे नमूद केलेल्या उपाययोजना करूनही जर संपूर्ण अनुशेष भरून काढता आला नाही, तर मागासवर्गीयांच्या निवड यादीमधून फक्त शिल्लक अनुशेषा पुरती प्रतिक्षा यादी तयार करून ती प्रतिक्षा यादी संपेपर्यन्त भविष्यात जशी जशी पदे उपलब्ध होतील त्या सर्व पदांवर [म्हणजे उपलब्ध होणा-या १००% रिक्त पदांवर] प्रतिक्षा यादी वरील उमेदवारांची नियुक्ती करण्यात यावी. अशा प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांना यापुढे देण्यात यावयाच्या नियुक्तीच्या वेळी क्याअधिक समजण्यात येणार नाही.

<u>टिप</u>:- [१] वरील [अ], [ब] आणि [क] येथील उपाययोजना प्रमाणे नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची संख्या दिनांक ३० जून, १९८९ रोजी असलेल्या अनुशेषाच्या पदांपेक्षा अधिक नसावी.

[२] वरील [क] बाबत असा खुलासा करण्यात येतो की सध्या अस्तित्वात असलेल्या पदां संदर्भात किंवा पुनरुज्जीवित करण्यात येणा-या पदां संदर्भात होणा-या सर्व १०० प्रतिशत जागा अनुशेष भरून काढण्यासाठी वापरण्यात याव्या. प्रतिक्षा यादी संपुष्टात आल्यानंतर मात्र आरक्षण हे नेहमीच्या नियमाप्रमाणे जास्तीत जास्त ५०% पर्यन्त मर्यादित राहील.

२. याबाबत असाही खुलासा करण्यात येतो की, दिनांक ३० सप्टेंबर, १९८९ च्या नंतर वाढत्या कामाच्या संदर्भात किंवा अन्य कारणास्तव शासनाच्या मंजूरीने नव्याने पदे निर्माण करण्यात आल्यास त्या नवीन पदांचे संदर्भात आरक्षण हे नेहमीच्या निर्णयाप्रमाणे जास्तीत जास्त ५०% पेक्षा अधिक असणार नाही.

३. सर्व नियुक्ती / सक्षम अधिका-यांनी वरील आदेशांची नोंद घेऊन सरळ सेवा भरतीचा अनुशेष भरून काढण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्र. द. माळवे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,

एच-८८८[३५००-१०-८९]-१३

सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे / सचिव, राज्य निवड मंडळ,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
संचालक, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सर्व जिल्हा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प,
सर्व जिल्हा सेवायोजन अधिकारी,
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील इतर सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख.

---

* पत्राने.

*************